# जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक (भुसंपादन शाखा) यांचे कार्यालय

ईमेल – palaqnashik@gmail.com फोन नं. ०२५३ - २३९००६

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
क्र.भुसं/कक्ष/१०/३/कावि/३११ / २०२०
नाशिक दिनांक :- १० / ०२ / २०२०

## अधिसुचना ४(१)(२)
## (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास)

भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३

क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ ज्याअर्थी, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या पंरतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसुल व वन विभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२ दिनांक ११ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमिन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी **इगतपुरी गावाच्या पाणी पुरवठा योजना करीता** (जेथे ज्या प्रयोजनासाठी जमिन संपादित करावायाची आहे त्या प्रयोजनाचा तपशील नमुद करावा) या यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन संपादन करण्याचा, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या **नाशिक** जिल्हयाच्या उद्येश आहे.आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये देण्यात आलेल्या, सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करण्यासंबधातील तरतुदी विचारात घेता समुचित शासनाने सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करणे आवश्यक आहे.

उपजिल्हाधिकारी वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांचे कार्यालय
11 FEB
आ. क्र.

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिन संपादन करण्याचा समुचित शासनाचा हेतु असल्यास ते बाधित क्षेत्रामधील ग्राम स्तरावार किंवा वॉर्डस्तरावरील संबधित पंचायत, नगरपालिका किंवा यथास्थिती, महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करून अशा शासनाकडुन अधिसुचनेव्दारे विनिर्निष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा दिनांकापासुन सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अंमलात आणेल अशी तरतुद उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट कलम (१) मध्ये करण्यात आली आहे.

त्याअर्थी आता, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेला, **नाशिक** जिल्हयाचा जिल्हाधिकारी याव्दारे असे अधिसुचित करते की, बाधित क्षेत्रामध्ये. **श्री. चक्रधर स्वामी, बहुद्येशीय संस्था, मु.पो.दलपतपुर ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक** (येथे अभ्यास अभिकरणाचे नाव विनिर्दिष्ट करावे) यांच्याकडुन, भुमिसंपादन, पुनर्वसन व पनुर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पादरदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मध्ये विहीत केलेल्या रितीने दिनांक १० / ०२ / २०२० नुसार दिनांक विनिर्दिष्ट करावा सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्यात येईल.

## अनुसुची

### जमिनीचे वर्णन व तिच्या चतु:सिमा

गांव. तळेगाव ता. इगतपुरी जि. नाशिक

| अ.क्र | भुमापण किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १८१/२/२ | ०.१६ हे.आर |

पुर्व –
पश्चिम –
दक्षिण –
उत्तर –
दिनांक :- १० / ०२ / २०२०
ठिकाण :- नाशिक

( सूरज मांढरे )
जिल्हाधिकारी नाशिक

प्रत:-
१. उपजिल्हाधिकारी ( भुसंपादन ), वै.ज.प्र., नाशिक
२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यस्थापना विभाग, नाशिक
३. मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक / मालेगांव
४. तहसिलदार ---------------------
५. गटविकास अधिकारी ------------------------------
६. पंचायत समिती / नगर परिषद -------------------------------------
७. ग्रामपंचायत / सरपंच / तलाठी -------------------------------------
८. श्री. चक्रधर स्वामी, बहुद्येशीय संस्था, मु.पो. दलपतपुर ता. त्र्यंबकेश्वर जि.नाशिक यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

स्वा/xxxx
( सूरज मांढरे )
जिल्हाधिकारी नाशिक